Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# "माध्यामिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा शिक्षकांच्या कौटुंबिक समायोजनावर होणाऱ्या परिणामाचा तुलनात्मक अभ्यास."

**प्रा. डॉ.अनिल देवराव वरघट**
मार्गदर्शक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा

**लोमेश सुधाकरराव खैरकर**
संशोधक विद्यार्थी
शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा

## सारांश

राष्ट्राचा विकास हा संपूर्णपणे समाजाच्या विकासावर अवलंबून असतो. आणि समाजाचा विकास हा सामाजिक स्थितीवर अवलंबून असतो. आजचे बालक हे उद्याचे भविष्य आहेत तसेच ते बालक उद्याचे आपल्या राष्ट्राचे सुज्ञ नागरीक आहेत. त्यासाठी समाजातील सर्व बालकांना शिक्षण मिळणे गरजेचे असून प्रत्येक बालक हा सुज्ञ व उच्च शिक्षीत असणे ही काळाची गरज आहे. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थी टिकून राहण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये परिर्वतन घडवुन आणणे ही काळाची गरज आहे. व्यक्तीचा सर्वांगीण विकास हा आपण शिक्षणाच्या मंदतीने घडवून आणु शकतो. म्हणून माध्यमिक स्तरावरील शाळेचा मुख्य उद्देश समाजातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास घडवून आणणे हा होय.आज कोणतेही क्षेत्र घेतले तर आयुष्यात प्रचंड यश मिळण्यासाठी चांगले उच्च शिक्षणाचे भांडवल असावेच लागते. शिक्षणाने आपले संपुर्ण व्यक्तीमत्व विकसित होते. आजच्या युगात सगळ्याच क्षेत्रात तीव्र स्पर्धा आहे. परीक्षेत चांगले गुण मिळविणे हे फारच महत्वाचे झालेले आहे. त्यानुसारच पुढच्या प्रवेशाची, शिक्षणाची आणि आयुष्याची दिशा ठरते. म्हणुनच अभ्यास करणे अतिशय महत्वाचे झालेले आहे. यासाठी प्रथम विद्यार्थ्यांला अभ्यासात रस असणे अत्यत महत्वाचे आणि जरुरीचे आहे. अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना नेहमी आपल्या मनात एक सकारात्मक आशावादी वृत्ती जोपासावी आणि अभ्यासात त्याला कितपत यश हवे याची स्पष्ट कल्पना प्रथम त्याच्या मनात ठाम असावी. अभ्यासात अफाट यश मिळविण्याचा एकच निश्चित मार्ग आहे आणि तो म्हणजे प्रमाणिक आणि नियमितपणे अभ्यास व खूप मेहनत करणे. संपादन = बुध्दीमत्ता x मेहनत या सुत्राने बरीचशी सामान्य बुध्दीची मुले सुध्दा चांगली मेहनत करून प्रथम श्रेणीत उत्कृष्ट गुण मिळवत असतात. आज आपण शाळा, वर्ग यांचा विचार केला तर यामध्ये असणारे विद्यार्थी व त्यांना येणाऱ्या समायोजन समस्या किती प्रमाणात असतील हे सांगायला नको, कारण वेगाने वाढणारी विद्यार्थी संख्या, वाढत्या जीवघेण्या स्पर्धा, मानसिक ताण, कलह, हव्या त्या गरजांची पूर्तता न होणे यामुळे हे प्रमाण ग्रामीण भागात दिवसेंदिवस वाढत चालले आहे. हे शैक्षणिक क्षेत्रात योग्य नाही. विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास हे ध्येय घेता विद्यार्थ्यांच्या संतुलित विकासामध्ये समायोजन समस्या अडथळा आणू शकतात.

व्यक्तीचे परिस्थितीशी समायोजन चार पायऱ्यांनी होते.पहिल्या पायरीवर किंवा टप्प्यावर एखादी गोष्ट साधण्याचा हेतू निश्चित होत असतो, हेतू एकदा झाला की तो पूर्ण करण्यासाठी, साधण्यासाठी व्यक्तीला भिन्न भिन्न मार्ग सुचतात ही झाली दुसरी पायरी पण हे मार्ग हाताळत असतांना त्यात अडथळा येतो. हेतू साध्य करणे अडथळ्यामुळे शक्य होत नाही. त्या अडथळ्यांना दूर

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

करून हेतू साध्य करण्यासाठी मार्ग शोधून काढला जातो ही समायोजनाची तिसरी पायरी होय. अखेर शेवटी हेतूपूर्वी केली जाते ही समायोजनाची अंतिम पायरी होय. समायोजन साधण्यासाठी विविध मार्ग असतात. व्यक्ती योग्य मार्गाने पुन्हा-पुन्हा प्रयत्न करून यश संपादित करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करते. व्यक्ती कधी कधी आपल्या सर्व शक्ती पणाला लावून प्रसंगी धोका पत्कारून चढाई करते. त्यातून यश मिळते. पण यश मिळाले नाही तर भरपूर प्रयत्न केल्याचे समाधान मिळते. समायोजनाचा तिसरा मार्ग म्हणजे ध्येयाचा नाद सोडून देणे हा होय. नटी होणे शक्य नाही, ना मग नटी होण्याची इच्छा सोडून देणे, दुसरे ध्येय निश्चित करणे, गायिका होण्याचे किंवा नर्तिका होण्याचे ध्येय गाठता येईल का, मग ते ध्येय निश्चित करणे, याशिवाय समायोजनाचा आणखी एक मार्ग व्यक्ती स्वीकारात असते आणि तो म्हणजे अपयश आले तरी त्या गोष्टींचे समर्थन करीत राहणे या संरक्षण यंत्रणेद्वारे समायोजन साधणे असे म्हणतात.

## सुसंयोजित व्यक्तीची वैशिष्टे :-

गेट्सच्या मते, "सुसंयोजित व्यक्ती तो आहे जो आवश्यकता आणि त्याची पुर्ती सामाजिक दृष्टिकोन तथा सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून करतो."

'परिस्थिती' व 'स्व' यामध्ये संतुलन असते.

समाजातील इतर व्यक्तीचा मान सन्मान ठेवतात

या व्यक्ती सहनशील असतात.

मुलभूत गरजाविषयी पूर्ण समाधानी असतात.

आत्मविश्वास, भावनात्मक पक्वता, निर्णयक्षमता, परिस्थितीचे ज्ञान इ. गुण असतात.

आपली जबाबदारी स्विकारतात.

या व्यक्ती सुखी व समाधानी असतात.

सामाजिकता, आदर्श चरित्र आणि जबाबदारी याची त्यांना जाणीव असते.

या व्यक्ती शारीरिक स्वास्थाविषयी व व्यक्तिगत सुरक्षेविषयी अतिशय दक्ष असतात.

या व्यक्तींना स्वाभिमान असतो व इतरांचाही सन्मान करतात.

## समायोजनाचे घटक :-

### गरजा :-

व्यक्तिच्या गरजा प्रथम अनर्जित स्वरूपाच्या असतात. सामाजिक संपर्कामुळे त्यांचा विकास होवून त्या अर्जित म्हणजे संपादित बनतात.

### प्रेरणा :-

शरीरातील आणि मनातील ज्या घटकांमुळे व्यक्ती विशिष्ट ध्येयपुर्तीकरीता वर्तन करण्यास व चालु ठेवण्यास प्रवृत्त होते या घटकास 'प्रेरणा' म्हणतात.

### विफलता :-

प्रेरणा मिळाल्यामुळे व्यक्ती उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करायला लागते पण पहिल्याच प्रयत्नात त्याला यश मिळेल असे नाही तर त्याला अनेक अडचणींचा सामाना करावा लागतो. त्या दूर झाल्या नाहीत तर व्यक्ती निराश होतो व विफलता निर्माण होते.

### समस्यापूर्ती :-

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

व्यक्तीला उद्दिष्ट साध्य करण्याकरीता प्रेरणा मिळाल्यावर यश न मिळाल्यास विविध प्रयत्न केल्यावर निश्चितच समस्येचे समाधान होऊ शकते आणि समस्यापूर्ती होते.

## कौटूंबिक समायोजन:-

व्यक्तीचे कुटूंबामधील व्यक्तींच्या बरोबर समाधानकारक संबंध असणे, व्यक्तीला कुटूंबातील व्यक्तीच्या सहवासामध्ये आनद लाभणे, व्यक्तीला कुटूंबामध्ये सुरक्षित वाटणे याला कौटूंबिक समायोजन असे म्हणतात. कुटूब हा एक महत्त्वाचा सामाजिक घटक आहे. बालकाचा जन्म कुटूंबामध्ये होतो. बालकाच्या शारीरिक, भौतिक, भावनिक, गरजा कुटूंबामध्ये भागवल्या जातात. बालकाच्या शारिरिक, भौतिक भावनिक गरजा कुटूंबामध्ये भागवल्या जातात कुटूंबामध्ये व्यक्तीला सामाजिक नितीनियम, चालीरीती, रूढी, परंपरा, शिष्टाचार, विविध वर्तन प्रकार, भावनांची अभिव्यक्ती इत्यादी बाबी आत्मसात करता येतात. व्यक्ती या सर्व बाबींचे अनुकरण करतो. व तिला प्रशिक्षण मिळते. बालकाला कुटूंबामधील व्यक्तीच्या समाधान आणि सुख लाभते. त्यामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. कौटूंबिक समायोजनावर कुटूंबाचा प्रकार, बालसंगोपनाची पध्दत, पालकांचे व्यक्तिमत्त्व, तसेच पालकांचा दर्जा इत्यादी बाबी परिणाम करतात.

**मुख्य शब्द : शिक्षक व्यवसाय समाधान,कौटुंबिक समायोजन तुलना**

## संशोधन निबंध शीर्षक:-

**"माध्यामिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा शिक्षकांच्या कौटुंबिक समायोजनावर होणाऱ्या परिणामाचा तुलनात्मक अभ्यास."**

## संशोधन निबंध विषयाची उद्दिष्टे:-

माध्यामिक शाळेतील शिक्षकांच्या कौटुंबिक समायोजनाचा अभ्यास करणे.

माध्यामिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा शिक्षकांच्या कौटुंबिक समायोजनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

माध्यामिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा,शिक्षकांच्या कौटुंबिक समायोजनावर होणाऱ्या परिणामाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## संशोधन निबंध परिकल्पना:-

माध्यामिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधान गुणांकात सार्थक फरक आढळत नाही.

माध्यमिक शिक्षकांच्या कौटुंबिक समायोजनाबाबत सार्थक फरक आढळत नाही.

## संशोधन पध्दतीची निवड:

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान काळाशी संबंधित असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली आहे .

## प्रस्तुत संशोधनातील नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनासाठी यादुच्छिक पध्दतीने माध्यमिक शाळेतील 100 शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. नमुना सुगम याद्दच्छिक पध्दतीने निवडण्यात आला आहे.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनात चाचणी या साधनाचा अंवलब करण्यात आला आहे.

व्यवसाय समाधान चाचणी ही ज्ञान प्रबोधिनी संस्था पुणे यांची आहे.

कौटुंबिक समायोजनासाठी प्रज्ञा मानस संशोधिका ज्ञान प्रबोधिनी संस्था पुणे, यांचा उपयोग करण्यात आला आहे .

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## संशोधन निबंध विषयाचे निष्कर्ष

शिक्षण प्रणालीतील प्रत्येक (संस्थाचालक, विद्यार्थी, पालक, कर्मचारी, अधिकारी, इत्यादी.) यांच्याशी योग्य संबंध प्रस्थापित करता आले पाहिजे.आवश्यक क्षमता बी.एड. एम. एड. अभ्यासक्रमातून पूर्ण होणे अपेक्षित असते. ही अपेक्षा सहज अभ्यासक्रमातून पूर्ण होते किंवा नाही? होत नसेल तर अभ्यासक्रमात बदल करणे आवश्यक आहे याचाही विचार करण्याच्या दृष्टिकोनातून सदर संशोधन समस्यांचा अभ्यास करण्याची गरज आहे.

शिक्षकाचे व्यवसाय समाधान व्यक्तीला योग्य मार्गाने पुन्हा-पुन्हा प्रयत्न करून यश संपादित करण्यासाठी अटोकाट प्रयत्न करते. व्यक्ती कधी कधी आपल्या सर्व शक्ती पणाला लावून प्रसंगी धोका पत्कारून चढाई करतो. त्यातून यश मिळते. पण यश मिळाले नाही तर भरपूर प्रयत्न केल्याचे समाधान मिळते.

समायोजनाचा तिसरा मार्ग म्हणजे ध्येयाचा नाद सोडून देणे हा होय. नटी होणे शक्य नाही, ना मग नटी होण्याची इच्छा सोडून देणे, दुसरे ध्येय निश्चित करणे, गायिका होण्याचे किंवा नर्तिका होण्याचे ध्येय गाठता येईल का. मग ते ध्येय निश्चित करणे, याशिवाय समायोजनाचा आणखी एक मार्ग व्यक्ती स्विकारत असते आणि तो म्हणजे अपयश आले तरी त्या गोष्टीचे समर्थन करीत राहणे. शिक्षकांचे व्यवसाय समाधान याकरिता काही मुख्य ध्येयाला महत्त्व देण्याची आवश्यकता आहे.

माध्यामिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधान गुणांकात सार्थक फरक आढळतो.

माध्यमिक शिक्षकांच्या कौटुंबिक समायोजनाबाबत सार्थक फरक आढळतो.

## संशोधन निबंध शिफारशी

निसर्गत: प्राप्त झालेल्या बुध्दीचा पुरेपुर वापर करावा.

सल्लामसलतीसाठी योग्य व्यक्तीला जवळची व आपलीशी करून त्यांच्याकडून सल्ला घ्यावा.

विनाकारण अहम बाळगुण, स्पर्धा निर्माण करून वैफल्याला निमंत्रण देऊ नये.

"जगी सर्व सुखी असा कोण आहे" या मतांचा विचार करून कार्य करा.

स्वत:चे गुण संवर्धित करण्याचा व दुर्गण कमी करण्याचा प्रयत्न करावा.

स्वत:च्या न्युनतेबद्दल कुंठत बसू नये.

सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा.

## संदर्भ ग्रंथ सूची

जगताप ह.ना. (२००६) शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास, पुणे, नूतन प्रकाशन. पु.क्र 35 15.

राणे एस. एस. (२००२), 'मानसशास, जळगाव, प्रशात पब्लिकेशन. पु.क्र 23 19.

वीरकर प्र. क्र. गंदे प्र. घ. सामंत द. गो. (१९६३), प्रायोगिक शैक्षणिक मानसशाखा पुणे, ठोकळ प्रकाशन. पु.क्र 45

मुळे आणि वि. तु. उमाठे (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे', नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथ निर्मिती मंडळ. पु.क्र 15